सत्यमेव जयते
# महाराष्ट्र शासन
## सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्र. 0712-2557266/46
E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : www.rdtenagpur.org.in

क्र.तांशिस/प्राकाना/शैवि-1/ करोना/2020/ 1016 दिनांक:- 16 MAR 2020
अत्यंत तातडीचे

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित पदवी,
पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर जिल्हा, नागपूर

विषय:- राज्यातील करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत... (शहर हद्दी लगतच्या शैक्षणिक संस्था बंद ठेवणेबाबत)
संदर्भ:- मा. जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र. जिनिक/क.लि/आदेश/कावि.130/2020, दि. 14/03/2020

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालीका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील व्यावसायीक अभ्यासक्रम राबविणारे सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित पदवी पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था साथरोग प्रतिबंधक कायदा, 1897 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतूदीनुसार दिनांक 31 मार्च 2020 पर्यंत बंद ठेवण्याबाबत मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांनी कळविलेले आहे, त्यानुसार सर्व महाविद्यालये व तंत्रनिकेतने बंद ठेवण्याची कार्यवाही करावी, तसेच त्यांनी दिलेल्या निर्देशांचे पालन करावे.

परंतू विश्वविद्यालयाच्या परीक्षा वेळापत्रकानुसार घेण्यात याव्या.

**सहपत्र**:- संदर्भिय पत्राची प्रत संलग्न.

(डॉ. राम निबुदे)
**प्र. सहसंचालक**
**तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.**

प्रत:- 1. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांना माहितीकरीता मानार्थ सादर.
२. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (का.क्र. 2अ) यांना माहितीकरीता सविनय सादर.

C:\Meshram Degree\Letters\Letter to All Institute.doc

# जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर

फोन नंबर ०७१२/२५६२६६८
ई-मेल rdc_nagpur@rediffmail.com

क्र.जिनिक/क.लि./आदेश/कावि. १३०/२०२०
दिनांक:- १४/०३/२०२०

## आदेश

संदर्भ — मा प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालयीन पत्र क्र. कोरोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य ५/दिनांक १४ मार्च २०२०

शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेले आहे.

या अनुषंगाने शासना द्वारे प्राप्त झालेल्या सुचना तसेच साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित केलेल्या अधिसुचना व नियमावली तरतुदीनुसार खालील प्रमाणे नागपूर जिल्हयात कार्यवाही करण्यात यावी:

- जिल्हयातील सर्व नगर पालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व आंगणवाड्या, सरकारी व खाजगी शाळा तसेच माहाविद्यालय व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणीक संस्था यांना दिनांक ३१ मार्च २०२० पर्यत बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात येतात.
- तथापी सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील दहांवी व बारांवीच्या परीक्षा तसेच विश्वविद्यालयाच्या परीक्षा विविध वेळा पत्रकानुसार घेण्याचे निर्देश देण्यात येतात.
- त्याच प्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थाच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी बाळगण्याचे निर्देश देण्यात येतात.
- कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक योजनेचा एक भाग म्हणून नागरीकाची एका ठिकाणी गर्दी टाळण्यासाठी जिल्हयातील सामाजीक, सांकृतीक, राजकीय, धार्मिक, क्रिडा विषयक कार्यक्रमांना पुढील आदेशापर्यत प्रतिबंध लावण्यात येतात.
- तसेच सर्व शॉपींग मॉलमधील सर्व दुकाने व आस्थापना (अत्यावश्यक किराणा सामान (Grocery), दुध व भाजीपाला व अन्य जीवनावश्यक वस्तू व औषधालय (Chemist Shop) वगळून), चित्रपटगृहे, तरणतलाव, व्यायामशाळा व नाट्यगृहे ३१ मार्च २०२० पर्यत बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात येतात.

वरील प्रमाणे निर्गमित केलेल्या आदेशांचे सर्व संबंधितांनी पालन करावे. जो कोणी उपरोक्त निर्देशाचे पालन करणार नाही त्यास साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

जिल्हाधिकारी,
नागपूर

प्रतिलिपी — माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर
२. पोलिस अधिक्षक, नागपूर (ग्रामिण), नागपूर
३. उपविभागीय दंडाधिकारी, (सर्व)
४. उपविभागीय पोलिस अधिकारी, (सर्व)
५. तालुका दंडाधिकारी, (सर्व)
६. मुख्यधिकारी, नगर पालिका / परिषद / पंचायत, (सर्व)
७. मुख्यकार्यकारी अधिकारी, कॅटोंन्मेंट बोर्ड, कामठी
८. जिल्हा क्रिडा अधिकारी

जिल्हाधिकारी,
नागपूर

Scanned with CamScanner